# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२५/M/०००६८२**

**अपिलार्थी श्री. अनिल लक्ष्मण कांबळी**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक**
अधिन उपनिबंधक, सहकारी संस्था, जी/एस विभाग, मल्होत्रा हाऊस,
६ वा मजला, जी.पी.ओ.समोर, फोर्ट, मुंबई -४०० ००१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक**
अधिन उपनिबंधक, सहकारी संस्था, जी/एस विभाग, मल्होत्रा हाऊस,
६ वा मजला, जी.पी.ओ.समोर, फोर्ट, मुंबई -४०० ००१.

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ३०.०४.२०२६</u>**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित(प्रतिनिधी)

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १९.१२.२०२४ | १५.०१.२०२५/१७.०३.२०२५ | २८.०१.२०२५ | ०५.०३.२०२५ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १८.०३.२०२५ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानंतरही अपूर्ण माहिती देण्यात आली असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १५.०१.२०२५ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ०५.०३.२०२५ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. १९.१२.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *RAHEJA ATLANTIC CO- OPERATIVE HOUSING SOCIETY, GANPATRAO KADAM MARG, NEXT TO A TO Z*
*(1) Entire inspection documents and copies till date. From date of application for formation of Society and Election held time to time along with the name of the committee members till today (2) C.C. (3) O.C. (4) Original Approved lay out plan. (5) Action taken report for Non-compliance, If any. (6) Date of handing over Society by Developer.*

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. १५.०१.२०२५ रोजी अपिलार्थीना कळविले की, आपण मुद्दा क्र. १ व २ अन्वये रहेजा ॲटलांटीक को-ऑप सोसायटी लि., या संस्थेचे कागदपत्रांची मागणी केली आहे. सबब, आपणांस कळविण्यात येते की, आपण सदर संस्थेचे सभासद आहेत किंवा कसे? याबाबत आपण माहिती सादर केली नाही. त्रयस्थ पक्षकाराला माहिती पुरविणे अभिप्रेत नाही. त्यामुळे आपणांस उपरोक्त प्रमाणे माहिती देता येणार नाही.

..२/-

४. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. २८.०१.२०२५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०३.२०२५ रोजी ज्याअर्थी, अपिलार्थी हे जरी संस्थेचे सभासद नसले तरी त्यांचा गाळा बाबत वाद असुन याबाबत अपिलार्थी यांनी मा. न्यायालयात दाद मागितली असून व त्याठिकाणी रहेजा ॲटलांटीक को-ऑप हौसिंग सोसायटी लि., या संस्थेची कागदपत्रे अपिलार्थी यांना सादर करावयाचे असून अपिलार्थी यांनी मागणी केलेली कागदपत्रे देण्यास हरकत नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अर्जाचे उत्तर विहित मुदतीत अपिलार्थी यांना दिले आहे. तथापि, अपिलार्थी हे सभासद नसल्याने त्यांना माहिती कशा करिता पाहिजे हे जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अर्ज दाखल करते वेळीच अर्जात नमुद करणे अथवा जन माहिती अधिकारी यांना निर्दशनास आणुन देणे आवश्यक होते. मात्र अपिलार्थी यांनी असे केले नाही व त्यामुळे माहिती / कागदपत्रांची करिता आवश्यक शुल्क अपिलार्थी यांनीच भरणा करणे उचित होईल.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारा नुसार माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अपिलकर्ते श्री. अनिल कांबळी यांचे अपिल अर्ज अंशतः मान्य करण्यात येत आहे. तसेच अपिलार्थी यांनी मागणी केलेली कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांनी तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावी असे आदेशित करुन अपील निकाली काढलेले आहे.

५. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. २९.०४.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशानंतर त्यांनी अपिलार्थींना संबंधीत नस्तीचे निरीक्षण उपलब्ध करुन दिलेले आहे. तसेच त्यांना दि. १७.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये माहिती शुल्क भरण्याकरीता कळविले होते. त्याप्रमाणे त्यांना संबंधीत संस्थेची नोंदणी धारिकाची १ ते १४९ पृष्ठांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

६. अपिलार्थी यांनी मान्य केले की, त्यांना संबंधीत संस्थेची नोंदणी धारिकाची १ ते १४९ पृष्ठांची माहिती प्राप्त आहे. परंतु त्यांनी संबंधीत अभिलेख निरीक्षणाकरीता उपलब्ध करुन देण्याची मागणी केली. तसेच अपिलार्थी यांनी संबंधीत अभिलेख दि. ०७.०५.२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजता निरीक्षणाकरीता उपलब्ध करुन देण्याची विनंती केली.

७. अपिलार्थी यांनी त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीसह जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दि. ०७.०५.२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजता उपस्थित रहावे व जन माहिती अधिकारी यांनी ज्या नस्तीमधून अपिलार्थींना माहिती दिलेली आहे, त्या नस्तीचे निरीक्षण अपिलार्थींना द्यावे व त्यापैकी जी माहिती अपिलार्थींना हवी आहे ती अपिलार्थींना शुल्क आकारुन उपलब्ध करुन द्यावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

प्रदीप व्यास 30-4-2026

**मुंबई**
**दिनांक : ३०.०४.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**